# Cherry Land

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी

# चेरी लँड




निर्मिती
Bharari Creation
The Kids Magazine

रु.२०

ऑगस्ट २०१३

वर्ष पहिले । अंक नववा ऑगस्ट २०१३ । मुंबई । पाने - ४८ । किंमत - रु. २०




मुख्य संपादक : लता गुठे
कार्यकारी संपादक : रवीन्द्र आवटी
सल्लागार संपादक : माधवी कुंटे
चेरी लँड हे मासिक मालक, प्रकाशक लता गुठे, मुद्रक शावा ग्राफिक्स, प्रेस - इथून प्रकाशित केले.
संपादक : लता गुठे
TC -

मुखपृष्ठ, संकल्पना, मांडणी व छपाई :
**शावा ग्राफिक्स**
ए१/५०४, विजयनगर सोसायटी,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पूर्व),
मुंबई - ४०० ०६९.
९८२१६९६०९८ / ९८६७९१८२९२
shavagraphics@gmail.com

वर्गणीदार आणि जाहिरातीसाठी
संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :
४०३, धनलक्ष्मी विहार, नंदा पातकर रोड,
विलेपार्ले (पूर्व). मुंबई - ४०० ०५७.
९८७०६१७१२४
lataguthe@gmail.com
www.lataguthe.com

निर्मिती
Bharari Creation

# अंतरंग

प्रतिक्रिया........................................ ४
हत्तीदादा (भारती म्हात्रे)............................ ५
पुंड्याला अद्दल घडली (माधवी कुंटे)................. ६
Cherry Land - Membership Form ............. १२
The Green Slide (Kalpana Kothare) .......... १३
The Indian State & Capitals .................... १६
गुरुपौर्णिमा (मुक्ता केणेकर)........................ १८
Flowery ............................................ २१
जादूचं पाणी (डॉ.सुमन नवलकर).................. २२
Counting Practice .............................. २८
नेट सेट गो (ज्योती कपिले)......................... २९
Sudoku ............................................. ३०
चित्र रंगवा.......................................... ३१
Be Happy Eat Healthy (Mohana Karkhanis).. ३२
Join The Dots.................................... ३४
बेस्ट फ्रेन्ड (सरस्वती दातार) ....................... ३५
Crossword......................................... ३९
'बी' चं झालं सुंदर झाड (एकनाथ आव्हाड) .......... ४०
Do It !! (Mili Bhatt) ............................. ४०
Write the Story on Picture गोष्ट तयार करणे .... ४१
सोनेरी छत (लता गुठे).............................. ४२
Addition Practice ................................ ४५
Lazy Boy (Dr. Suman Navalkar) ............... ४६


लता गुठे

बालमित्रांनो,

चेरी Land हा जुलै महिन्याचा आठवा अंक. प्रत्येक अंक वाचून आपण त्याचा आनंद घेता. प्रत्येक महिन्याला तुम्ही मला फोन करून मेसेज पाठवून, मेल करुन तुमच्या प्रतिक्रिया कळवता. तुम्हाला आणखी काय हवं आहे तेही सांगता. त्यामुळे प्रत्येक महिन्याच्या मासिकात आम्ही तुमच्या आवडी-निवडीनुसार बदल करत असतो. तुमच्या प्रतिक्रिया ऐकून आम्हाला ही खूप आनंद होतो. अशाच तुमच्या समस्या, तुमचे प्रश्न, तुमचं साहित्य आमच्याकडे वेळोवेळी पाठवत जा. ते आम्ही तुमच्या फोटोसहित छापत जाऊ. एखाद्या महिन्यात मासिक लवकर मिळालं नाही तर मुलं मासिकाची वाट पहातात, विचारतात असे त्यांचे पालक सांगतात. ते ऐकून खूप बरं वाटतं.


आमचे जे बाल साहित्यिक चेरी Land मध्ये, सण, उत्सव, कथा, परीकथा, कविता, गाणी, skits, general knowledge, jokes इत्यादी उत्कृष्ट साहित्य लिहितात. मुलांच्या सर्वांगिण विकासाच्या उद्देशाने केलेला हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात मुलांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. मुंबईसहित सर्व जिल्ह्यामध्ये ही मासिकं आज उपलब्ध आहेत.

मला तुमच्याशी बोलायला तुमचे विचार जाणून घ्यायला आवडेल. तुम्हाला आणखी काय हवं आहे ते ई-मेल पाठवून, फोन करून, मेसेज पाठवून जरूर कळवा हं. मासिकामध्ये आपल्याला कोडी सोडवायला, चित्र रंगवायला दिले आहे ते ही पूर्ण करून प्रत्येक महिन्याला पाठवून द्या. छान छान गिफ्टस्पण मिळवणार आहात. तुम्हालाही काही कविता, एखादी आठवण, शाळेतील गंमती जंमती, लेख पाठवावेसे वाटेल तर पाठवा.


तुमचं आवडतं
चेरी Land





अंक पहिला



अंक दुसरा




अंक तिसरा




अंक चौथा



अंक पाचवा



अंक सहावा




अंक सातवा




अंक आठवा

## प्रतिक्रिया

माझ्या लहानपणी किशोर, ठक-ठक, चंपक इत्यादी बालमासिकांची चलती होती. काळाबरोबर वाचन संस्कृती कमी होत गेली. पण, आमच्या शाळेत तुमचं 'चेरी लॅण्ड' मासिक सुरु केलं आणि निदान आमच्या शाळेत तरी, मुलांच्या वाचन संस्कृतीचं पुन्हा रुजवणं झालं. तुमचा उपक्रम खरोखरंच स्तुत्य आहे; या मासिकाच्या वाचनामुळे उद्या चांगले वाचक तयार होतील यात शंकाच नाही. 'चेरी लॅण्ड' मधील सर्व सदरे मुलांसाठी उपयोगी ठरतील. सर्व शिक्षकांना व मुख्याध्यापकांना मी आवाहन करू इच्छितो, की सदर बालमासिक आपल्या शाळेत त्यांनी जरूर सुरु करावे.

आपल्या उपक्रमास सर्वतोपरी शुभेच्छा. शुभम् भवतू

**प्रा. वैभव साटम**

# 15 AUGUST 1947
# Independence Day



"A moment comes, which comes but rarely in history, when we step out from the old to the new... India discovers herself again." – J.L. Nehru. On the eve of India's independence, Pandit Jawaharlal Nehru famous speech "Tryst with Destiny" marked the beginning of a free India with words symbolizing hope and triumph.

This month incredible India is celebrating its 64th Independence day. India got its independence from the clutches of British rule on 15th August 1947. It was this day when India's tricolor flag was unfolded by Pandit Nehru on the barricades of the Red Fort at Delhi. Each and every patriotic soul watched with excitement and paid tribute to thousands of martyrs who sacrificed their lives for India's freedom.


The Independence Day of India is a moment of delight and grandeur but to achieve it the nation had to put up a long battle for over two centuries against the British Empire. At last on 3rd June 1947, the last British Viceroy of India, Lord Mountbatten of Burma, declared the separation of the British Empire in India into India and Pakistan. The announcement was made under the terms of the Indian Independence Act 1947.

15th August 1947 symbolizes the victory of Indian patriotism, which the nation got after uncertain yet brutal struggle from the repression of the British colonialism. The British, who oppressed India for centuries had primarily arrived to initiate business but steadily captured the entire government of the nation. They educated the Indians and in the process generated enthusiasts who weren’t hesitant in helping them expanding their regime.

Men and women from all over India joined hands and fought for India’s freedom. Many were acclaimed while others contribution went unnoticed. However, praise was not what they desired for. It was the dream of free and autonomous India that motivated them to walk the path of struggle unselfishly. Neither did they battle for their region nor for their natives, but for India and Indians.

# Happy Independence Day

# ठेंगूच्या लबाडीची शिक्षा





परीराज्यात दिवाळीची तयारी खूप जोरात चालली होती. एरवी साधी भाकरी, भात, भाज्या, फळांचा रस, गाजर, मुळे असे जेवण असायचे. ढोलू यक्ष स्वयंपाकघराचा प्रमुख होता. तो सगळ्या फळांचे मुरांबे, भाज्या मिठात मुरवून लोणची वगैरे करायचा; पण तळलेले पदार्थ, केक, बिस्किटे, मिठाया असे पदार्थ परीराज्यात नसायचे. ठेंगूजीला गावात मित्र मिळाले होते. ते त्याला असले पदार्थ देत असत; त्यामुळे त्याला या पदार्थांची चटक लागली होती. तो ढोलू यक्षाला म्हणायचा, "तू कर की कधीतरी भजी, वडे, वेफर! सगळ्यांना आवडतील."

ढोलू मोठे डोळे करून झारा उगारत म्हणायचा, "ठेंग्या, पळ इथून! आपल्या इथे असं चालत नाही. परीराणीची मनाई आहे." मग ठेंगूजीला लहर आली की तो गावात मित्रांकडे जायचा आणि अशा पदार्थांवर ताव मारायचा. मग रात्री सगळे जेवायला बसायचे तेव्हा भूक नाही म्हणायचा. हरित परी एकदा परीराणीला म्हणाली, "अलीकडे ठेंगूचं पोट बिघडतं सारखं. काय औषध मागत असतो." परीराणीच्या सगळं लक्षात आलं होतं. ठेंगूचं गावात जाणं बंद करायचं असं तिनं ठरवलं. दिवाळीतच अदलाबदल करायची.

दिवाळीत मात्र ढोलू यक्ष चकली, चिवडा, लाडू, शेव असं सगळं करायचा; पण सगळ्याना थोडंथोडंच मिळत असे. या दिवाळीत ढोलूने फराळाचे पदार्थ करायला सुरुवात केल्यावर ठेंगूजीला फार आनंद झाला. सगळ्या झाडांवर दिवे लावण्याचे काम पऱ्या करू लागल्या. सूर्यदेवांनी त्यांच्या किरणांनी बनवलेलं यंत्र दिलं होतं; त्यामुळे छान

चमचमते दिवे पेटायचे. रुपेरी परीच्या मोगऱ्याच्या महालावर रुपेरी दिवे, हरित परीच्या महालावर हिरवे दिवे अशी गंमत असायची. फुलांच्या सुगंधाचे अर्क काढून अत्तराच्या कुप्या सुगंधी परी सगळ्यांना द्यायची. परीराणी नवे पोषाख द्यायची. सगळी दिवाळी तयारी चालू असताना ठेंगू परीराणीला म्हणाला, "आपण फटाके आणायचे का यावेळी?"

परीराणी म्हणाली, "आपल्याकडे त्या आवाजाने सगळे प्राणी घाबरून जातील. शिवाय फटाक्यांच्या धुरामुळे सगळे आजारी पडतील. परीराज्यात फटाके चालणार नाहीत." ठेंगूजी हिरमुसला. परीराणी हसून म्हणाली, "सूर्यदेवांनी मला एक खास यंत्र दिलं आहे. त्यातून झऱ्याच्या पाण्यावर सुंदर रोषणाई होते. चंद्रदेवांनी त्या दिवशी चंद्रलोकीच्या गायकांना पण पाठवायचं कबूल केलं आहे; त्यामुळे त्या गाण्याच्या तालावर नाच करणारी प्रकाशित कारंजी बघायला मिळतील. मग तर झालं?"

ठेंगूजीनी समाधानाने मान हलवली. पाडव्याच्या दिवशी चंद्रलोकच्या गायकांचा ताफा आला. परीराणीने नवीन कारंजांच्या उसळत्या लहानमोठ्या धारांवर रंगीबेरंगी प्रकाशझोत टाकायला सुरुवात केली. चंद्रलोकचे गायक गात होते त्या तालावर कारंजांच्या धारा गोल फिरत होत्या, वर जात होत्या, एकमेकीत मिसळत होत्या, आकृत्या काढत होत्या... फारच मस्त दिसत होतं सगळं. मग सगळ्यांची फराळाची पंगत बसली. जेवण झाल्यावर परीराणी म्हणाली, "आता मला नवीन कामं कुणाकुणाकडे सोपवायची आहेत. तेव्हा सगळेजण इथे बसा."

सगळेजण रिंगण करून बसले. परीराणी म्हणाली, "गेली पाच वर्षे झंखू यक्ष काहीजणांना मदतीला घेऊन शेतात धान्य पिकवतो. शंखू यक्ष फळबागांची काळजी घेतो आणि व्यंकू यक्ष भाजीपाल्याच्या मळ्यांची काळजी घेतो. या कामात दुसरे यक्ष, पऱ्या, प्राणी नेहमी मदत करतात. आता झंखू रुपेरीला मदत करेल. गावात फरफटका मारेल, कुणा मुलांना काही त्रास होतोय का,

कुणाला काही मदत हवीये का ते बघेल. शंखू यक्ष हरित परीला मदत करेल. औषधी वनस्पतींचे अर्क काढायचे, झाडांची काळजी घ्यायची हे काम लंबू यक्षाकडे होते; तो आता फळबागेकडे लक्ष देईल. ठेंगू शेताच्या कामाकडे लक्ष देईल. सोना यक्षीण लाल परीला मदत करायची, फुलबागा सांभाळायची. तिच्याऐवजी व्यंकू यक्ष लाल परीला मदत करेल आणि सोना भाज्यांच्या मळ्याकडे लक्ष देईल." सोना यक्षीण आणि लंबूजीने लगेच म्हटलं, "चालेल, कामात जरा बदल झाला की मजा येते."

ठेंगूजी मात्र वैतागला. गावात जायला, भटकायला, मित्रांबरोबर मजा करायला मिळणार नव्हती. त्याऐवजी शेतात राबायला लागणार होतं. त्या घंटेच्या आकाराचं मोठ्ठं फुलाचं घर सोडून शेतातल्या लाकडी घरात रहायला लागणार होतं; पण परीराणीचा हुकूम मानणं भाग होतं. त्याचं वाकडं तोंड बघून परीराणी मनातल्या मनात हसली. आता याला अंगमेहनत करायला लागेल आणि त्याच्या सवयी सुधारतील अशा विचाराने तिने रुपेरी परीकडे पाहिलं. रुपेरी परीनं मान डोलावली.

दिवाळीच्या दुसऱ्या दिवसापासून ठेंगूजी शेतातल्या घरात रहायला गेला. तिथेच दुसऱ्या शेतात काम करणाऱ्या यक्षांनी त्याला मदत केली. नांगर, बैलाची जोडी त्याला दिली. गोठ्यात काळी गाय आणि तिचं वासरू होतं. शेताच्या कडेला छान झाडं डोलत होती. विहीर होती. खुराड्यात कोंबड्या होत्या, बदकं होती, शेजारून छोटासा ओढा झुळझुळ वाहत होता; पण ठेंगूजीला हे आवडलं नाही. दिवसभर शेतात राबून आल्यावर हातपात धुऊन तो निळ्या तळ्याकाठी आला तेव्हा झंखू यक्ष गावात फिरून आल्याची गंमत सांगत होता. तो राजूला भेटला होता. शिवाय चंदूशी भेट झाली होती. ते सगळे मिळून नदीत पोहले होते. एका आजारी मुलाला विनोद सांगून त्यानं हसवलं होतं. ते सगळं ऐकून ठेंगूजीला अगदी राग आला. हा झंखू मजा करतोय आणि आपल्याला शेतात घाम गाळावा लागतोय असं वाटल्यानं तो

अगदी गप्प बसून राहिला. लवकरच तो आपल्या शेतावर गेला. दुसरे यक्ष शेकोटी पेटवून त्याभोवती गाणी म्हणत बसले होते. काहीजण नाचत होते. त्यांनी ठेंगूजीला बोलावलं; पण अजून त्याच्या मनातला राग गेला नव्हता. तोंड वाकडं करून तो आत जाऊन अंथरुणावर पडून राहिला.

सकाळी पंचरंगी पहाटपक्षी गात गात गेला तेव्हा त्याला उठावंच लागलं. बैल घेऊन शेताची नांगरणी करावी लागली. तेव्हा लाल तोंडी आणि काळ तोंडी माकडं इकडून तिकडे नाचत होती. त्याच्या मनात एक कल्पना आली. त्याने दोन्ही माकडांना बोलावलं आणि म्हटलं, "काय रे, नुसतेच इकडेतिकडे नासधूस करत हिंडता? काही कामधाम करायचं की नाही? थांबा, तुमच्यावर जादूचं पाणी फेकतो म्हणजे पाय लंगडे होतील. मग बसाल पाय धरून."

माकडं त्याच्याकडे येऊन हात जोडून म्हणाली, "असं नका करू ठेंगूजीराव! आम्ही काय फळं शोधतो, इकडे तिकडे हिंडतो, आनंदात नाचतो."

"अरे नाचायच्याऐवजी इथे काम करा. चला, तण काढा. बैलांना पुढे चालवत हे शेत आठवड्याभरात नांगरून ठेवा. कळलं?" ठेंगूजीने म्हटलं.

माकडं म्हणाली, "हो ठेंगूजीराव, तुम्ही म्हणाल ते काम करू; पण आमच्यावर जादूचं पाणी फेकू नका."



"ठीक आहे, त्या सशांना बोलवा. ओढ्यापासून कालवा काढला आहे. त्यातून दर दोन तासाचे ठोके वाजले की पाणी सोडा. खारींना म्हणावं पेरणीसाठी तयार रहा."

काम नीट चालू असलेलं बघून ठेंगूजी लपतछपत परीराज्याच्या बाहेर पडला. त्याच्या हातात सूर्यदेवांनी दिलेली संरक्षक कवचाचं दार उघडण्याची जादूची छडी होतीच. बाहेर पडल्यावर त्यानं मागे वळून पाहिलं. कुणी त्याच्या मागावर आलं नव्हतं. मग तो आरामात डोलत, गाणं म्हणत, शिटी वाजवत गावातल्या नदीकाठच्या मैदानावर आला. तेथे राजू, छोटू, चंदू सगळे भेटले. आता पुंड्याही त्यांच्याबरोबर खेळायला लागला होता. त्या सगळ्यांशी गप्पा झाल्यावर ठेंगू म्हणाला, "अरे यार, खूप दिवस झाले, वडे-भजी खाल्ली नाहीत."

पुंड्या म्हणाला, "एवढंच ना? चल तुला वडे घेऊन देतो."

वडे, जिलेबी वगैरे चापून ठेंगूजी परत आला. तोपर्यंत माकडांनी चोख काम केलं होतं. ठेंगूने खारींना अक्रोड आणायला फर्मावलं. लंबूला म्हटलं, "तुझ्या द्राक्षांच्या मळ्यातली द्राक्षं हवी आहेत...."

लंबू म्हणाला, "परीराणीला विचारून देतो."

ठेंगू म्हणाला, "एवढ्या तेवढ्यासाठी परीराणीला कशाला सांगायचं? मीच दोनचार घड काढून नेतो." असं म्हणून त्यानं भरपूर द्राक्षे नेली आणि सुकवून त्याचे बेदाणे केले. ते बेदाणे त्यानं गावातल्या मित्रांना दिले तेव्हा ते म्हणाले, "अरे टॅंगो, अलीकडे तुमच्या त्या भागातून शंकर नावाचा मुलगा पण यायला लागलाय. तोही आम्हाला मदत करतो बरं का! तुझी त्याची ओळख आहे का?"

ठेंगूने ओळखलं की शंखू यक्ष रुपेरी परीबरोबर येत असणार! ठेंगू म्हणाला, "नाही रे, मला कुणी शंकर नावाचा मुलगा माहीत नाही. जाऊ दे. आपण जरा नदीवर मासे पकडूया"

ठेंगू इकडेतिकडे हिंडून परत गेला तेव्हा माकडांनी, खारींनी, इतर प्राण्यांनी काम केलेलं होतं. ऐटीत कपडे बदलून तो निळ्या तळ्याकाठी

जेवायला गेला; पण भूक नव्हती. शेव, केक, समोसे खाल्ले होते. त्याचं पोट बिघडलं होतं. परीराणीचं बारीक लक्ष होतं. तिनं आपल्या कुत्र्यांना बातमी काढायला पाठवलं होतं. ठेंगू सगळी कामं गरीब ससे, माकडं, खारी, कोल्हे, कोंबडे, यांच्याकडून करून घेत असल्याचं तिला कळलं होतं. ठेंगूचं काम करण्याचं नाटक ती बघत होती. पीक तयार झाल्यावर ठेंगूने माकडांच्या टोळीलाच कामाला लावलं आणि तो गावात गेला तेव्हा सगळं धान्य परीराणीनं वेगळ्याच कोठारात भरलं. माकडं, खारी, बैल, कोल्हे सगळ्यांना पलीकडल्या जंगलात पाठवलं. ठेंगू आला आणि बघतो तर काय? सगळे प्राणी गायब झाले होते. धान्य नव्हतं. तो घाबरला. एवढ्यात परीराणी आली. ठेंगू म्हणाला, “परीराणी, चोरी झालीये.”

परीराणी म्हणाली, “तू असताना चोर कसे येतील ठेंगू? तू लपूनछपून गावात हिंडत होतास. तूच प्राण्यांकडून फुकट काम करून घेत होतास. मला सगळी बातमी मिळाली होती. त्यामुळे ते धान्य मी त्या प्राण्यांना दिलं आहे. त्यांच्या कष्टाने पिकलेलं धान्य त्यांनाच मिळायला हवं. आता परत कामाला लाग आणि आता तुझ्या मदतीला कुणीही येणार नाही. दुप्पट काम कर आता.... हीच तुझी शिक्षा.” आता ठेंगूला दिवसरात्र शेतावर राबावं लागलं. त्याला बाहेर जाताही येत नव्हतं. त्यानं परीराणीला वचन दिलं की पुन्हा कधीही खोटेपणा करणार नाही.

*– माधवी कुंटे*
*२६११६४८०*
*९८१९६७९५५०*



# लता वा. गुठे

M.A. B.Ed.


Bharari Creation

दिनांक : / /

## सभासदत्वासाठी अर्ज

मी 'बेटी [illegible]' हया [illegible] सभासदत्वासाठी रु. [illegible]/- चा [illegible] अर्ज सादर करत आहे.
माझी व्यक्तिगत माहिती पुढील प्रमाणे :-

पूर्ण नांव :

पत्ता : ______________________________

______________________________

______________ पिन कोड: ______________

दूरध्वनी क्रमांक : मोबाईल:

अर्जदाराची सही: ______________

दिनांक :

कार्यालयीन नोंद:


श्री/श्रीमती ______________ यांजकडून रु. ________ रोख/चेक क्रमांक : ______________
बँक शाखा दिनांक सभासद वर्गणी करिता प्राप्त झाले.
पावती क्र. दिनांक देण्यात आली.

आपली विश्वासू

लता गुठे
संपादिका


४०३ धनलक्ष्मी विहार, नंदा पाटकर मार्ग, विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७
दूरध्वनी : [illegible], मोबा. : [illegible]
ई-मेल: lataguthe@gmail.com - [illegible]

# Join The Dots



# जरा ऐकून तर घ्या!

पुढच्या आठवड्यातच राघवची इ. पाचवीच्या गटात नाट्यछटा सादर करण्याची स्पर्धा होती. स्पर्धा म्हटली की राघव एका पायावर तय्यार! स्पर्धेत भाग घ्यायला त्याला नेहमीच आवडायचं. स्पर्धेसाठी तो खूप मेहनतही घ्यायचा. आज नाट्यछटा लिहिण्यासाठीच तो वही पेन घेऊन बसला होता. त्याला वाटलं, इतर कुणा लेखकाची नाट्यछटा सादर करण्यापेक्षा आपणच लिहिलेली नाट्यछटा सादर करू, त्याची गंमतच वेगळी असेल. प्रयत्न तर करुन पाहूया. म्हणतात ना "प्रयत्नांती परमेश्वर". राघव वही, पेन घेऊन बसला खरा पण त्याला काही म्हणता काही सुचेना. तेवढ्यात आईने हाक मारली, "राघव... ए राघव, अरे मिठाची बरणी सापडत नाही. चुकून कामवाल्या गजराबाईंनी फडताळात ठेवली का बघ रे. अन् सापडली तर गच्चीवर घेऊन ये. मी गच्चीवर लोणच्यासाठी कैऱ्या वाळत घालते." आई गच्चीवर कैऱ्यांच्या फोडी घेऊन निघताना राघवला म्हणाली. पण राघव रागातच म्हणाला, "अगं आई, नाट्यछटा लिहायला बसलोय मी. एक तर मला सुचेना काही आणि त्यात तुझी कामाची घाई."

आई म्हणाली, "अरे या फोडींना मीठ लावून वाळवलं की खूप दिवस लोणचं टिकेल. तूच तर म्हणत होतास ना आई लोणचं कर, आंबट-चिंबट. मला वरण भाताबरोबर फार आवडतं." राघवने नाराजीनेच वहीत पेन कोंबून वही मिटली आणि तो उठला. फडताळ उघडले पण मिठाची बरणी काही दिसेना. म्हणून त्याने तिथले डबे पुढे मागे केले. तर कोपऱ्यात दडून बसल्यासारखी मिठाची बरणी त्याला दिसली. त्याने ती काचेची मिठाची बरणी हातात घेतली. एक हातात बरणी आणि दुसऱ्या हाताने फडताळाचं दार लावणार तेवढ्यात बरणी हातातून निसटून खाली पडली. काचेची बरणी खळकन फुटली. त्याच्या पायाजवळ मिठाचा जणू सडाच पसरला. आता

जमिनीवर पडलेलं मीठ गोळा कसं करायचं, बरणीच्या फुटलेल्या काचा कशा उचलायच्या. त्याला मोठा प्रश्न पडला. आई आता ओरडणार असाही विचार त्याच्या डोक्यात आला. "रोज इथं फडताळात मिठाची बरणी असते आजच अशी कोणी ठेवली तिथे?" तो स्वत:शीच पुटपुटला. तेवढ्यात कुठूनसा आवाज आला, "राघव, अरे मीच ठरवलं होतं फडताळात लपवून. कुणाला म्हणून घरात सापडायचं नाही." राघव इकडे तिकडे पाहत राहिला. कुठून आवाज येतोय? कोण बोलतंय? त्याला काही कळेना.

तेवढ्यात पुन्हा आवाज आला "राघव अरे खाली बघ पायाजवळ सांडलेलं मी मीठ बोलतोय." राघव एकदम उडालाच, पटकन खालीच वाकला. खाली पडलेल्या मिठाकडे एकटक पाहू लागला. मीठ म्हणालं "राघव घाबरू नकोस. मी काही तुला त्रास देणार नाही. अरे मी कुणालाच त्रास देत नाही. लोकांच्या उपयोगीच पडतो आणि उलट या माणसांचीच बोलणी खावी लागतात मला. खरचं सांगतो, तुझ्याजवळ मन मोकळं करावं म्हणूनच आज बोलतोय. नाही तर इतके दिवस निमूट सारं सहन करत होतो." मीठ आर्जवानं बोलत होतं. राघव मग शांतपणे मिठाजवळ बसूनच मिठाची कहाणी ऐकू लागला.

मीठ म्हणालं, "खरचं राघव, कधी कधी वाटतं या सर्वच घरांतून निघून जावं पुन्हा सागरास जाऊन मिळावं."

राघवने आस्थेने विचारलं, "असं का वाटतं तुला? एवढी नाराजी बरी नव्हे."

"आता बघ राघव. तसं पाहिलं तर मी खरं सर्व रसांचा राजा. स्वयंपाकात माझं अढळ स्थान. पण माझं कुण्णाला कौतुक नाही. उलट रागच. सारखं आपलं जेव्हा-तेव्हा खारट! अरे प्रमाण वगैरे ही माणसं शिकलीत की नाही? का भरली बुचकुली अन् टाकली भाजीत? अन् बोंब मात्र माझ्या नावाची. म्हणे मीठ झालं जास्त. हूँ! मी नसू द्या, मग बघा कसा स्वयंपाकाचा सगळा बेरंग होऊन जातोय तो! माझ्याशिवाय सगळे मसाले रडकुंडीला येतील ना, तेव्हा कळेल यांना." राघव उत्सुकतेने ऐकत होता. मीठाचं बोलणं त्याला

पटतही होतं. मीठ म्हणालं, "आज ठरवलं होतं मी कुण्णाला म्हणून घरात सापडायचं नाही. अगदी लपून बसायचं फडताळात. शोधा मग किती शोधताय ते. पण राघव तुला पाहिलं आणि वाटलं तू नाही कधी वेडवाकडं बोललास मला. म्हणूनच मी तुझ्या हाती अगदी आनंदानं आलो, माझी कहाणी सांगायला."

राघव म्हणाला, "खरच सांग ना रे तुझी गोष्ट."

मीठ बोललं, "समुद्राच्या पाण्यापासून तयार झालो मी अन् लोकांच्या उपयोगी पडण्यासाठी घराघरांत आलो. अरे नुसतं स्वयंपाकातच नाही तर यांच्या दातातील कीड बरी करण्यासाठी, चामडी कमविण्यासाठी मीच यांच्या मदतीला धावून जातो. माझे अनेक भाऊबंद आहेत; सैंधव (शेंदेलोण), पादेलोण, बोडलवण, सांबरलोण, दरयाई असे कितीतरी. यांच्याकडे जाईन मी. माझा सैंधवभाऊ तर खाणीतून येतो आणि या माणसांच्या कित्ती कित्ती उपयोगी पडतो. वात, पित्त, कफ या तीन दोषांपैकी जो दोष शरीरात वाढला असेल त्या दोषाला हा शांत करतो. पण प्रत्येक गोष्ट प्रमाणाताच उपयोगी पडते. ही साधी गोष्ट ही माणसं का विसरून जातात? जीभेवर ताबा न ठेवता बका बका खात सुटतात. काय बोलायचं या लोकांना? अरे राघव, औषधाचीसुद्धा मात्रा कमी अधिक झाली तर ते औषध विष ठरू शकतं, हे कुणी सांगावं या झोपलेल्यांना! यांच्या आहारात माझा वापर केलेले पदार्थच अधिक. मग मला सांग, होईल की नाही यांच्या शरीरात आवश्यकतेपेक्षा माझे प्रमाण जास्त. मग ह्या अतिरिक्त प्रमाणामुळे पचनक्रिया, शरीरातील धातूंचे व वाताचे संतुलन बिघडणारच! जठरातील दाह वाढणारच, सांधे दुखणं, डोकं दुखणं, मुत्ररोग यांसारखे विकारसुद्धा उद्भवणारच. पण यात माझा काय दोष. यांना आपलं सारख चवीचवीनं खायचंय त्याला मी तरी काय करू? शरीराचंसुद्धा काही म्हणणं असतं हे नको या लोकांना समजायला?" राघवला आता मीठाचं म्हणणं चांगलचं पटलं.

मीठ म्हणालं, "अरे राघव तुला सांगतो या लोकांना मी कित्ती उपयोगी पडतो. सकाळी सकाळी गरम पाण्यात मीठ विरघळून ते पाणी प्यायलं की उलटीवाटे पित्त व कफ पडून जातो यांचा. गरम पाण्यात मीठ घालून गुळण्या केल्यास घसा दुखणे, टॉन्सिल वाढणे, गळ्याला सूज येणे हे विकार चुटकीसरशी बरे होतात यांचे. पाण्यात मला घालून ते पाणी उकळून नंतर कोमट करून प्यायल्यानं विषमज्वर बरा होतो. ओवा व मीठ वाटून त्याचे चूर्ण घेतल्यानं पोटदुखी बंद होते. मीठ व हळद पाण्यात बारीक वाटून मुरगळल्याजागी लावल्यानं होणारी पीडा कमी होते. सरसूच्या तेलात मीठ कालवून ते मंजनाप्रमाणे दातावर चोळल्यास पायोरिया (दाताचा एक रोग) बरा होण्यास मदत होते. मधमाशीच्या दंशावर मीठ चोळल्यानं आराम पडतो. कोमट पाण्यात एक ते दीड चिमूट मीठ घालून रोज रात्री प्यायल्याने आतडी साफ होतात. मलावरोध दूर होतो व शौचशुद्धी होते. एक ना दोन माझे अनेक उपयोग. पण हे सर्व केव्हा? जेव्हा माझं सेवनं योग्य प्रमाणात होईल तेव्हाच. दुर्गंधकारक व जंतुनाशक ही माझी खरीखुरी गुणवैशिष्ट्ये आहेत, हे आता तू ओखळलं असशिलच."

राघवचे डोळे लकाकले. बापरे! केवढे हे मीठाचे उपयोग. आपल्याला फक्त भाजीत, आमटीत मीठ घालतात एवढंच माहीत. पण आज आपण या मीठाचं बोलणं ऐकून घेतलं अन् आपल्या ज्ञानात केवढी भर पडली. राघवने पटकन चुटकी वाजवली आणि तो मीठाला म्हणाला, "चला मला आजच्या नाट्यछटेला विषय मिळाला, जरा ऐकून तर घ्या, मी मीठ बोलतोय!" त्याने मीठाला धन्यवाद दिले खाली पडलेलं मीठ बरणीच्या काचा पटापट भरल्या आणि मीठाचं बोलणं नाट्यछटेतून कागदावर उतरविण्यासाठी त्यानं वही उघडली आणि डोक्यातले विचार तो भरभर कागदावर लिहू लागला. त्याचं पेन आता कागदावर जणू तुरुतुरु पळत होतं.


*– एकनाथ आव्हाड*

*९८२१७७७९६८*

Colour picture



# ढगांची शाळा



आकाशात भरली
ढगांची शाळा
भराभर सर्व
झाले गोळा

सारे सारे ढग
शाळेत आले
आकाशी शाळेत
नाचू लागले

शिकता-नाचता
शाळा सुटली
सर्व ढगांची
धांदल उडाली



सैरा-वैरा
ढग लागले पळू
एक दुसऱ्यावर
लागले कोसळू

पळता-पळता
रडू फुटले
पावसाच्या सरीत
ढग बरसले

*– धोंडीराम सिंह ध. राजपूत*
*९४२१३१२२४४*

# Little Guddi

May holidays are over. It is the first day of school. Little Guddi is ready for the school. she is wearing a new school-uniform. She has a new school-bag and a new tiffin-box too! Guddi is also carrying a plastic bag. It contains a gift for her teacher.

Shyam uncle takes children to school in his rikshaw. He stops is rickshaw near Guddi's house. Guddi gets in and meets her rickshaw friends. They all go to the same school but their class-rooms are different. 'Good Morning techer!' says Guddi as she enters her class-room. She offers her gift to the teacher, but the teacher does not take the plastic bag. She says, 'Guddi, please give this gift to your new teacher. You are not in my K.G. class anymore. You are a first-standard girl now!'. Guddi looks in the class-room, there are new faces. 'Teacher, where is Peter, Sam, Shobha and Sonu?' she asks. The teacher says, 'Guddi please go to the next class-room. Your friends must be waiting for you there.' Guddi says, 'Bye, bye teacher!' and runs to the class-room nearby.

'Guddi! Come to sit near me!' everyone shouts and welcomes Guddi. Guddi likes her new class-room very much! There are no small chairs here. Like big boys and girls, her friends are sitting on benches in a group os three. Guddi finds an empty place to sit near the twin sisters Soni and Moni. As soon as she takes her seat, the bell rings. Their new teachers enters with a long book in her hand. Everyone stands and says, 'Good morning teacher!'

Guddi goes near the new teacher and offers the plastic bg with a gift in it. The teacher says, 'Thank you little girl, what ia your name?', 'I am Guddi and they are my friends Soni and Moni' answers Guddi pointing out her friends. The teacher asks Guddi to take her seat.

The new teacher tells them that her name is Nancy. She opens the long book on her table. She tells them that the book has all their names in it. She says, 'children, now I will say your names one by one. You must answer and say 'present please!, what will you say?' 'Present please!' everyone says together. The teacher then reads out each one's name. Turn by turn, each one answers 'present please!'. The teacher closes the book after marking something in it. She tells them that this is called 'role-call.' Guddi likes this roll-call system very much!

Then Nancy teacher asks them about their holidays. 'What did you do in your May vacation?' Everyone starts talking. There is lot of noise. Nancy teacher makes a sign of 'shshs' by keeping a finger on her lips. Everyone copies her and soon the class-room is quite.

Peter puts up his hand. Nancy teacher calls him and makes him stand near her. Peter starts his holiday story. He moves his hands like an aeroplane while telling the story. Because he is telling them that he went Goa by aeroplane. He makes noise like an aeroplane. Soon everyone is saying 'zooom' with him. Peter's trip to Goa is thus enjoyed by everyone.

Then comes little Madhu. She learns Indian dancing. Teacher Nancy asks her to show them what she has learnt in holidays. Madhu does some steps of Bharat Natyam. Everyone claps. Some of Guddi's friends even join Madhu in saying 'Tayuuma tat, tat, Tayuum Ta.' Thus they enjoy Madhu's short dnce.

Shobha has a drawing-book to show everyone. She went to a drawing class in the holidays. Then Shan tells how he fell down from a Pony. He had gone to a hill station with his parents. He now knows lil bit of hose-riding. Soni Moni's mother teaches cooking to other ladies. They helped their mom to wrap chocolates and cakes. Ofcourse they have brought chocolates for their friends too!

At last Guddi's turn comes to tell friends what she did in the holidays. She went to her uncle's farm. He showed her how to sprout a seed and then plant it. After some says there is a green stem on the sprout and tiny leaves come one by one. Guddi now knows how to plant a tree. Guddi tells her friends that her uncle knows how to make earthen pots. She is small but decides to handle uncle's pot-making wheel when she grows up.

Nancy teacher takes out from the plastic bag, Guddi's gift. It is an earthen pot with a small plant in it. Small, tiny, colourful flowers are smiling on the plant. Nancy teacher tells them that these flowers called Sadafuli. Teacher says 'thank you Guddi!' Everyone in the class enjoys looking at the beautiful gift from Guddi.

*- Kalpana Kothare*
*26104552*

# ढण् ट् ढण्... चेरी लँड



डराव डराव... ढण् ट् ढण्
बेडूकराव वाजवती बँड
बुडुक बुडुक आवाज करीत
मासे होते साथ करीत
एकसाथ म्हणत होते ..... ढण् ट् ढण् ।।






पोपटभाऊंनी वाजवली शिट्टी
सगळ्या पक्षांनी केली दाटी
फुलपाखरे ऊडू लागली
फुलासंगे बागडू लागली
बागडतांना म्हणू लागली ..... ढण् ट् ढण् ।। १।।






वाघ सिंहाची झाली दोस्ती
हत्ती सोबतकरती मस्ती
माकडमामा मारती छड्या
अस्वलदादा मारती उड्या
उड्या मारतांना म्हणती ..... ढण् ट् ढण् ।। २।।





थेंब टपोरे झाडांवर पडती
पाना पानासवे खेळती
वाऱ्यासंगे पाऊस आला खिडकी अन् दारात
नाचत खेळत गाऊ लागली मुले एक सुरात
गातांनाही म्हणू लागली ..... ढण् ट् ढण् ।। ३।।

पाऊस आला ... पाऊस आला ... ढण् ट् ढण्
घेऊन आला ... घेऊन आला ... चेरी लँड



– पपा दळवी
९८२०७८५१२४

# JUNGLE

Look at the animals and fill in the missing vowels for each animal name



T _ g _ r




B _ f f _ l _



H _ r _ e



G _ r _ f f _



Z _ b _ a



C _ m _ l

# Chunnu and Munnu plan to celebrate Independence Day!

**Scene I**

Jai Bharat Society of Chunnu and Munnu.

***Chunnu:*** Good Morning Munnu!

***Munnu:*** Good Morning Chunnu!

***Chunnu:*** This year, we all are lucky since monsoon rains have started on time.

***Munnu:*** Yesss, it is really a good news for all the farmers and common people.

***Chunnu:*** Do you know that this year in June ,we had maximum rainfall and till now all the rivers ,wells and main sources of water supply have sufficient water content?

***Munnu:*** Wow! I must say that this is a Great news for us!

***Chunnu:*** Unfortunately, there are bad news also. In Uttarakhand and in few other places there were heavy rains and thousands of pilgrims had been rescued. Many houses collapsed and there was a tragic end of some soldiers who went to rescue the pilgrims.

***Munnu:*** Oh! that was really a sad news! But we should be proud of our brave soldiers, who worked there day and night to save our people.

***Chunnu:*** We salute our soldiers for doing such a great job by sacrificing their lives.

***Munnu:*** We should always remember that we are safe today in our houses since 'they' are fighting for us.

***Chunnu:*** We have an opportunity to remember them on 15the August, our Independence Day!

***Munnu:*** Very true Chunnu! Let's go and find out what are our friend's plans to celebrate our independence day!

(Chunnu and Munnu enter the common hall of their society

where all children and their parents have gathered .)

**Scene II**

***Parent 1:*** Hello, everyone! It is a very bright day and nice to see you all together here.

***Parent 2:*** As we all know, very soon we will celebrate India's 66th Independence Day. On the eve of Independence Day, the President of India delivers the"address to the Nation" The prime minister hoists the Indian flag on the ramparts of famous monument Red Fort at Delhi. Twenty one guns are fired in honour of the solemn occasion.

***All children together:*** Thank you uncle for sharing such a good information with us. But can you tell us now, how are we going to celebrate Independence Day in our society?

***Parent 1:*** Yes children , we will have flag hoisting in the morning followed by parades and cultural activities.

***Chunnu:*** We will sing some patriotic songs .

***Munnu:*** We will also have some drawing and story writing competitions.

***Annu:*** Our Khare uncle and his daughters will sing our National Anthem.


***Chunnu and Munnu:*** We will have flag hoisting In our school also.

***Parent 2:*** Children you are right. We will have more entertaining and educative programmes on this day but Now ,we will have some snacks here and disperse for our home.

***All children together:*** Yes, uncle and aunty. Thank you and goodbye!

# CROSSWORD


Guess the figures & complete crossword.
Write the **Solution** appearing in shaded box.




**Words:**

Easter Bunny
Painting
Chick
Duck
Eggs
Hatch
Chocolate
Basket
Flowers
Hunt


## Across

2. 

6. 

4. 

8. 

5. 

9. 

## Down

1. 

3. 

7. 

10. 

# बहुरुपी श्रावण

चातुर्मासातला पहिला पूर्ण महिना म्हणजे श्रावण. वर्षा ऋतूचा लाडका माहिना म्हणजे श्रावण. उन्हात पाऊस आणि पावसात ऊन मिसळणारा हा श्रावण. सण उत्सवांनी आणि व्रतवैकल्पांनी नटलेला श्रावण. पहिला सण नागपंचमीचा. शहरापेक्षा गाव खेड्यातून नागपंचमीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा होतो. सगळ्या मैत्रिणी गावाबाहेर जमतात. तिथे एखादं नागोबाचं वरुळ म्हणजे घर असतं. त्याची पूजा करुन गाणी म्हणत फेर धरतात. झाडांच्या फांद्यांना झोके बांधून माहेरवाशिणी लेकी सुना उंच उंच झोके घेत पंचमीचा सण साजरा करतात.

नागपंचमीच्या निमित्ताने शेतकऱ्यांचे मित्र असलेल्या नागाची पूजा केली जाते. नाग ही देवता आहे. महाराष्ट्रात बत्तीस शिराळे गावात साप व नाग धरले जातात त्यांची पूजा केली जाते नंतर त्यांना सोडून देतात. गुजरात उत्तर प्रदेशात काश्मिर हिमाचल भागात वेगवेगळ्या पद्धतीने पूजा केली जाते.

श्रावण महिन्यातला प्रत्येक वार वैशिष्ट्यपूर्ण आहे. सोमवारी शिवामूठ, मंगळवारी मंगळागौर, बुधवारी बुधबृहस्पती तर शुक्रवारी जिवतीची पुजा तसेच रविवारी आदित्यराणूबाईची पूजा केली जाते. त्यांच्या कहाण्यामधून त्यांचे महत्व सांगितलं आहे.

श्रावणी पौर्णिमेला नारळीपौर्णिमा. राखी पौर्णिमा किंवा पोवती पौर्णिमा म्हणतात. या एकाच दिवशी समुद्रपूजन, रक्षाबंधन आणि श्रावणी असे तीन प्रकारचे उत्सव साजरे होतात. आपल्या देशाला मोठा किनारा लाभला आहे. पूर्वीपासून भारताचा इतर देशांशी मोठा सागरी व्यापार चालू होता. मृग नक्षत्रापासून सुरू झालेल्या पावसाला श्रावणी पौर्णिमेला उतार पडतो. खवळलेला समुद्र शांत होतो. आतापर्यंत सागरी व्यवहार बंद असतात. समुद्रावर उपजीविका करणाऱ्या कोळी लोंकाचे तर सारेच व्यवहार बंद असतात. नारळीपौर्णिमेच्या दिवशी कोळी बांधव वरुणदेवतेची पूजा करून त्या

कलशासह एक सुवर्णवर्खी नारळ घेऊन गात गात नाचत नाचत मिरवणुकीने समुद्राला तो अर्पण करतात. आणि आपले व्यवहार सुरु व्हावेत अशी प्रार्थना करतात. त्या दिवशी इतर मंडळीही नारळाची वेगवेगळी पक्वान्ने तयार करून हा सण साजरा करतात.

याच दिवशी रक्षाबंधन किंवा राखीबंधन हा सण साजरा होतो. पूर्वी रक्षाबंधनाला पोवती पौर्णिमा म्हणत. सुताचे आठ फेरे करून त्याला आठ गाठी मारून गंधात बुडवून पवित्र करत. नंतर ठराविक मंत्र म्हणून ते देवाला अर्पण करत. गोड पदार्थाचा नैवेद्य करत. रक्षाबंधन म्हणजे बहिणीने भावाला राखी बांधून त्याला रक्षण करायला सांगायचं. विशेषतः राजस्थानात मुख्यतः हा सण साजरा केला जातो. ऐतिहासिक काळात रजपूत स्त्रियांनी शत्रूच्या छावणीत शिरून शत्रूसैनिकांना राखी बांधून युद्ध व वैर यांच्यावर घाव घातला अशी उदाहरणे आहेत. उदेपूरची राणी कर्मवती हिने गुजरातच्या बहादूरशहापासून रक्षण व्हावे म्हणून हुमायूनला राखी पाठवली होती. राखी पौर्णिमा हा सामाजिक उत्सव म्हणूनच साजरा व्हायला हवा. आजच्या परिस्थितीत त्याची अत्यंत आवश्यकता आहे.. त्या दिवशी जैन मंदिरात राख्या ठेवल्या जातात. जैन मुनी आदराने त्याचा स्वीकार करतात. पूर्वी श्रावणी म्हणजे ब्राह्मण मंडळी एकत्र जमून गायत्री मंत्राचा जप करून नवीन जानवं घालत. आज ही प्रथा जवळ जवळ नाहीशी झाली आहे.

पौर्णिमेनंतरची वद्य अष्टमी म्हणजे श्रीकृष्णाच जयंती. श्रीरामाचा जन्म भर दुपारी बारा वाजता तर श्रीकृष्णाचा जन्म मध्यरात्री बारा वाजता. दशावतारातला आठवा अवतार. मंदिरात किंवा घरगुती स्वरुपातही हा जन्मोत्सव साजरा होतो. श्रीकृष्णचरित्र तर सर्वांनाच माहित आहे. पण खरा उत्साह असतो त्या दुसऱ्या दिवशी दहिहंडीचा कार्यक्रमासाठी उंच उंच ठिकाणी भरघोस बक्षिसाच्या हंड्या लटकलेल्या असतात. आणि त्या फोडण्यासाठी सकाळपासूनच मंडळी

फिरत असतात. मानवी मनोरा रचण्याची प्रॅक्टीस कितीतरी आधी सुरू असते आणि यात हल्ली मुलीही भाग घेऊन यशस्वी होतात.

अमावस्येला श्रावण संपतो. तो बैलपोळ्याचा सण साजरा करुनच. आपले बरेच सण उत्सव शेतीची संबंधित आहेत. पूर्वीपासून आपला देश शेतीप्रधान आहे आणि शेतीसाठी उपयोगी पडणाऱ्या प्राण्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी आपली संस्कृती आहे. या दिवशी बैलांच्या रोजच्या कामाला सुट्टी दिली जाते. त्यांना स्वच्छ आंघोळ घालून अंगावर रंगीबेरंगी छाप उठवतात. शिंगाना लाल हिंगूळ लावून टोकांना पितळेच्या शेंब्या ठोकतात. पाठीवर झूल नवे दोर कासरे चारी पायात साखळ्या गळ्यात मण्यांच्या आणि घुंगूरघंटांच्या माळा घालून सजवतात. नंदीभावनेने त्याची पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवतात. संध्याकाळी त्यांची थाटात मिरवणूक निघते ती बघणं म्हणजे एक आनंद सोहळाच असतो. शेती न करणारे लोकही त्या दिवशी मातीचे लहान मोठे बैल आणून त्याची पूजा करतात.

पाश्चात्यांकडून आलेला मदर्स डे आपण सध्या साजरा करतो परंतु पूर्वीपासूनच श्रावणी अमावस्या हा मातृदिन आपल्या संस्कृतीत साजरा केला जातो. योग्यरितीने लालनपालन करुन वाढवलेल्या मुलांना मातांना मानवंदना देण्यासाठी त्यांचा सत्कार करण्यासाठी सध्या वेगवेगळे उपक्रम केले जातात. ही प्रथा फारच चांगली आहे आणि तिचा चढत्या वाढत्या प्रमाणात प्रचार आणि प्रसार व्हायला हवा.

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी दिडशे वर्षांच्या इंग्रजांच्या गुलामगिरीतून आपला देश स्वतंत्र झाला आणि दरवर्षी हा स्वातंत्र्योत्सव साजरा करण्याचा मान श्रावण महिन्याला मिळाला आहे. असा हा बहुरुपी श्रावण गणपतीबाप्पाला येण्याच निमंत्रण करुन हसतमुखाने आपला निरोप घेतो.

*– मुक्ता केणेकर*

*२६१४६७६०, २६१५५७७५*

# THE STORY OF THE BUG AND THE FLEA



In a certain country lived a king who had a very beautifully decorated bedroom.



An exquisite while silk sheet covered the bed and in the folds of the sheet, there lived a white flea, by the name of Mandavisarpini.

She used to drink the blood of the king and, in his way spent her time very happily.



One day a bug crept into the bedroom.

When the flea caught sight of him, she cried, " Oh you bug ! What are you doing here? Get out at once!"

"Madam", replied the bug, "that's not the way to speak to a guest, even if he is a good-for-nothing.

A guest should be made to feel welcome with sweet words and refreshments."

"And besides", continued the bug, "I have drunk all types of blood but so far I have never had the pleasure of tasting the blood of a king.

I think it must be very sweet, for he has been eating the choicest food. Now, if you will permit me, I would love to taste the king's blood."

"But Oh bug !," said the flea, "I only suck the king's blood when he has gone fast asleep but you are nasty and bite like a sharp needle.

However, if you promise to let the king go to sleep before you start biting him, then I will let you drink his blood."

"Oh, I do promise," replied the bug, "I will even swear to wait until you have sucked his blood before I suck it myself."



While they were talking, the king came and lay down on the bed.

The bug's mouth began to water and he took a bite of the king without waiting for him to fall asleep.

The bug's bite was like a sharp needle.

The king jumped up and cried out to his servants, "Hey! Something has bitten me! See if there is a bug or a flea in my bed."

When the bug heard this, he hid himself in a corner of the bed.



When the servants came and searched with sharp eyes, they found a flea lying between the folds of the sheets, and killed her.

The wise indeed way: The false promises of friends as well as strangers have no value. You end up paying for it.

# मेहनतीचे फळ

सोनूला आई-बाबा आठवतच नाहीत. कसे गेले तेही त्याला नीटपणे ठाऊक नाही. पण ते नाहीत आणि तो एकटाच आहे, हे त्याला ठाऊक आहे. शेजाऱ्या-पाजाऱ्यांनी दिलेलं उरलं-सुरलं खाऊन तो मोठा झाला. कोणाकडून काही मिळालं नाही, तर स्टेशनात जाऊन पोटभर पाणी पिऊन यायचं आणि झोपी जायचं, एवढं त्याला नीट माहिती आहे.

आता तो जरासा मोठा झालाय. त्यामुळे शेजार-पाजाऱ्यांना वाटतं की त्याने मोलमजुरी करून कमवावं आणि आपलं पोट भरावं. पण लहान असल्यामुळे त्याला कोणी कामासाठी ठेवूनही घेत नाही. शाळेला जायचं मात्र सोडलं नाहीये. स्टेशनात कोणाच्या बुटाना पॉलीश करायचं, कोणाची गाडी पुसायची. जे काही पैसे मिळतील त्यांनी शाळेची फी भरायची. पण शाळा सोडायची नाही.

पण हल्ली बरेच दिवस पुरेसं काम मिळालेलं नाही. त्यामुळे सोनूचा नाईलाज झालाय. फी भरली नाही म्हणून शाळेने सोनूचं नाव काढून टाकायचं ठरवलंय. सहा महिन्यांची फी थकलीय. कुठून भरणार सोनू? फी न भरल्यामुळे शाळेने अजून त्याला वार्षिक परीक्षेचा निकालही दिलेला नाही. सोनूने पेपर चांगले लिहिले होते. निकालाच्या दिवशी तो आतुरतेने शाळेतही गेला होता. पण हात हलवत परत आला आणि तेव्हापासून सोनूच्या छोट्याशा डोक्यात मोठे-मोठे विचार येतायत की फी कशी भरायची?

दिवसभर पोटात अन्नाचा कण नाही. नाही म्हणायला शुभमने पहिला नंबर आल्याबद्दल पेढे वाटले, तो एक पेढा तेवढा त्याने सकाळी खाल्ला होता. स्टेशनात जाऊन पोटभर पाणी पिऊन आला. पण आज झेपेने बंडच पुकारलंय. जेवण नाही, तर झोप नाही.

सोनू मग झोपडीच्या दारात येऊन बसला. पौर्णिमेचं चांदणं पसरलंय. चंद्राकडे सोनू पाहत असताना एक गंमत झाली. चंद्राच्या प्रकाशात

आकाशातून एक शुभ्र परी सोनूच्या अंगणात उतरली. शुभ्र कपडे, शुभ्र मुकुट, शुभ्र पंख आणि हातातली छडीही शुभ्र. छडीच्या टोकाला असलेली चांदणीही शुभ्र. परी सोनूकडे पाहत हसली. इतकी छान हसली की भुकेने रडवेल्या झालेल्या सोनूलाही थोडंसं हसू आलंच. पण हसता-हसता भुकेमुळे त्याचा चेहरा पुन्हा उडवेला झाला.

सोनूने वर्गातल्या राजूकडच्या गोष्टीच्या पुस्तकात परीचं चित्र पाहिलंय. म्हणून तर त्याने ओळखलं की ही परी आहे म्हणून. "रडू नको सोनू. भूक लागलीय ना तुला? हे घे." म्हणत परीने हात पुढे केला. हातात एक सुंदर फुला-फुलांची नक्षीदार बशी आणि बशीत रंग-बेरंगी मिठाई. भुकेलेल्या सोनूचा हात पटकन पुढे झाला. पण लगेच हात पाठी घेत सोनू म्हणाला, "नको परी राणी, इतक्या महागाची मिठाई मी फुकट कसा खाऊ?"

परीने पुढे होऊन सोनूचे डोळे पुसले आणि त्याला थोडीशी मिठाई भरवली. इतकी चवदार मिठाई सोनूने कधीही चाखली नव्हती. मग परीने त्याला आणखी मिठाई भरवली. आणखी भरवली. बघता-बघता बशीतली सगळी मिठाई संपली आणि सोनूलाही थोडं ताजंतवानं वाटायला लागलं.

"फी भरायची राहिलीय ना सोनू? पैसे आहेत बघ कपाटात." सोनूने कपाटात पैसे ठेवलेलेच नाहीत. मग अशी काय सांगतेय ही परी? "बघ ना रे सोनू,"परी पुन्हा म्हणाली. सोनूने कपाट उघडून पाहिलं. खरंच पैसे! बाप रे! इतके पैसे कुठून आले या कपाटात?

"हे पैसे कुठून आले परीराणी?"

"तुझ्या आई-बाबांचा आशीर्वाद आहे हा सोनू. त्यांनी पाठवलेत हे पैसे सोनू. उद्या शाळेची फी नेऊन भर आणि निकाल घेऊन ये तुझा."

"शाळेच्या फीचे फक्त तीनशे रुपये भरायचेत परीराणी. हे तर खूपच जास्त पैसे आहेत. शिवाय मेहनत न करता पैसे घेणं चुकीचं आहे ना परीराणी?" सोनूने सगळेच्या सगळे पैसे उचलून परीराणीच्या हातात ठेवले. "रागावू नकोस

परीराणी. मिठाई मी खाल्ली. पण पैसे नाही घेणार मेहनत करीन आणि शाळेच्या फीचे पैसे चुकते करीन."

परीराणी निघून गेली. झोपडीचं दार बंद करण्यासाठी सोनू दारापाशी गेला. बाहेर परीराणीचा मागमूस नव्हता. फुलाफुलांची नक्षीदार बशी मात्र पायरीवर ठेवलेली होती. सोनूने बशी आत आणून धुवून-पुसून कपाटात ठेवली आणि दार बंद करून तो झोपी गेला. खूप दिवसांनी सोनूला गाढ झोप लागली. पोट भरलेलं होतं ना?

पण बशी धुता-धुता सोनूला रामूशेठच्या हॉटेलची आठवण झाली. हॉटेलात तर शेठ काम करू देणार नाही. बाल-कामगार ठेवायला बंदी आहे ना? पण घरी आणून आपण शेठचं काम करून देऊ शकतो.

सकाळी उठल्यावर अंघोळ करून सोनू रामूशेठच्या हॉटेलात गेला. "शेठ, हॉटेलात नाही, पण घरी बसून मी तुमची कामं करून दिली, तर चालेल ना शेठ?"

"घरी बसून हॉटेलची कामं कशी करणार सोन्या?" रामूशेठने नेमका प्रश्न विचारला. "शेठ, लसूण सोलून देईन, कांद्या-बटाट्यांची सालं काढून देईन, वेलची सोलून देईन, वाटाण्याच्या शेंगा सोलून देईन. शिवाय शेठ, अचानक काही काम करून हवं असेल तर हॉटेलच्या पाठच्या दारात येऊन हाका मारा. पळत-पळत येईन शेठ. पण नाही म्हणू नका. शाळेची फी भरायची राहिलीय शेठ."

त्या दिवसापासून सोनूने रामूशेठचं काम पकडलं. लसूण सोलून बोटांची नखं दुखायची, कांदे सोलताना डोळ्यातून पाणी यायाचं, पण सोनूने माघार घेतली नाही. रात्री शिल्लक राहिलेलं जेवणही रामूशेठ द्यायचा. त्यामुळे जेवणाचे पैसे खर्च न होता पोटही भरत होतं.

पाहता-पाहता सोनूने अख्ख्या सुट्टीत पाचशे रुपये जमवले. आणखी पैसे कमवायला हवे होते, गेल्या वर्षीची फी भरली की दोनशेच रुपये शिल्लक राहणार होते. पुढल्या वर्षाचे पैसे भरायचे दिवसही जवळ आले होते.

शाळेच्या पहिल्या दिवशी सोनू

शाळेत गेला तो सरळ मुख्याध्यापिकाबाईंच्या खोलीत. "बाई, माझी गेल्या वर्षाची राहिलेली फी आणलीय. ही घ्या. आता मला माझा निकाल मिळेल ना? आणि पुढल्या इयत्तेत प्रवेश?"

"अरे सोनू ना तू? तुझा पुढल्या इयत्तेत प्रवेश कधीच झाला. तुझी मावशी येऊन तुझे फीचे राहिलेले पैसे देऊन गेली."

"माझी मावशी?" सोनू विचार करायला लागला. 'मला तर आई-बाबाही आठवत नाहीत. मग ही नवी मावशी कोण बुवा?'

"हा घे तुझा निकाल." बाईंनी सोनूला निकाल दिला. सर्व विषयांत चांगले गुण मिळाले होते. फीचे पैसे वाचले होते, त्यातून नव्या वर्षाची वह्या-पुस्तकं घेता येणार होती.

पण ही मावशी कोण बुवा? विचार करत-करतच सोनू घरी आला. हात-पाय धुवून पाणी पिण्यासाठी ओट्यापाशी गेला. पाहतो तो काय, ओट्यावर फुलाफुलांची नक्षीदार बशी होती आणि बशीत होती रंग-बेरंगी मिठाई!

अशीच एक बशी सोनूने धुवून कपाटात ठेवली होती आणि त्या बशीमुळेच सोनूला रामूशेठच्या हॉटेलचं काम करायची कल्पना सुचली होती.

संध्याकाळी सोनू रामूशेठकडे गेला. रामूशेठने याही वर्षी सोनूला काम देण्याचं कबूल केलं. सोनू आता खूप-खूप काम करणार होता आणि खूप-खूप शिकणारही होता. परीराणीमुळेच हे सगळं शक्य झालं होतं.

"थँक्यू परीराणी" नक्षीदार फुलाफुलांच्या बशीतली मिठाई खात-खात सोनू म्हणाला. पाहतो तो काय, दारात परीराणी उभीच होती. शुभ्र कपडे, शुभ्र पंख, शुभ्र छडी.

"तुझ्यासारख्या मेहनती मुलांना मी नेहमीच मदत करते." परीराणी म्हणाली आणि हसली. सोनूही हसला. यावेळी सोनूच्या डोळ्यात मुळीदेखिल पाणी नव्हतं. होता तो आत्मविश्वास. खूप शिकण्यासाठी हवाच होता तो.

– डॉ. सुमन नवलकर
९९६९०२८९६७

# Sir Isaac Newton – Founder of Calculus



Isaac Newton was born at Woolsthorpe near Grantham on 25 December 1642. His father died before he was born and in 1645 his mother marred a clergyman from North Welham in Leicestershire. She went to live with him while Isaac Newton lived with his grandmother. When her second husband died in 1656 Isaac's mother returned to Woolsthorpe and Isaac Newton went to live with her again.

From the age of 12 to 14 Isaac Newton went to Grantham Grammar School. During this time he lodged with an apothecary and his family. Then in 1659 Isaac had to leave to help his mother on the family farm. Isaac Newton was not in the slightest bit interested in running a farm and in 1660 he went to the grammar school again. In 1661 he went to Trinity College Cambridge. Isaac Newton obtained a BA in 1665. In 1666 Isaac Newton was forced to flee Cambridge because of an outbreak of the plague and he returned temporarily to Woolsthorpe. He returned to university in 1667.

In 1667 Isaac Newton was elected a fellow of Trinity College. The same year he was elected a member of the Royal Society. In February 1672 a paper he wrote about light and colours was read to the society. In 1669 Isaac Newton became Lucasian professor of mathematics. In the meantime, in 1668, he invented a reflecting telescope.

In 1689-1690 Isaac Newton was MP for Cambridge University (in those days Cambridge University had its own

MPs). He became an MP again in 1701-1702 but he did not take an active part in politics.


Isaac Newton published his masterpiece Philosophy Naturalis Principia Mathematica in 1687. It set out his theory of gravity and his laws of motion.

In 1695 Isaac Newton was made Ward of the mint and in 1699 Master of the mint. He resigned his fellowship and professorship at Cambridge in 1701.

In 1703 Isaac Newton became president of the Royal Society. He was knighted in 1705.

Meanwhile in 1704 Isaac Newton published another great work about light.

Isaac Newton died at the age of 84 on 20 March 1727.



# नेट सेट गो...

काय मग बालमित्रांनो काय म्हणतो पाऊस? पावसात भिजलात कि नाही? खरंतर तुम्हाला पावसात भिजायचं असतं आणि आई 'मात्र भिजू नको आजारी पडशील' असं म्हणते. अर्थात आई म्हणते ते बरोबरच आहे. कारण पावसाळ्यात दुषित पाण्यामुळे बरेचसे आजार होतात. पण तरीही ती पावसात भिजण्याची, पावसाच्या पाण्यात होड्या सोडण्याची मज्जा काही औरच असते नाही का? बरं मी काय विचारते, मी तुम्हाला इतक्या वेबसाईट बद्दल सांगितले आहे त्या तुम्ही बघितल्या की नाही? आवडली तर कळवा आणि नाही आवडली तरीही कळवा, ओके? असो.


आता जरा आपण आपल्या नव्या वेबसाईट बद्दल बोलूया ही वेबसाईट १९९८ पासून मुलांची, पालकांची आणि शिक्षकांची अगदी आवडती वेबसाईट आहे. आजच्या वेबसाईटचे नांव आहे, **www.kidsknowit.com** इकडे तुम्हाला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळणार आहेत आणि तेही एकदम फ्री! कारण ह्या साईटचा उद्देशच मुळी तुम्हाला उच्च दर्जाचे शैक्षणिक ॲक्टिव्हीटीज्, गेम्स, मुव्हीज्, पुस्तक, म्युझिक, वर्कशिटस् आणि विविध माहितीपूर्ण लेख देणं हाच आहे.

इकडे पक्षी-प्राण्यांबद्दल माहिती आहे, स्पेलिंग गेम्स आहेत जे खेळून तुमचे स्पलिंग्स पाठ होऊन जातील. तुम्हाला आवडणाऱ्या आणि आवडेल या पद्धतीने ॲनिमेशनने मुव्हिज तयार केलेले आहेत. त्यामुळे ते बघताना हसत-खेळत मजेत बघता येते आणि शिकताही येते. बरेच शैक्षणिक पोस्टरही आहेत ज्याचा तुम्हाला शाळेत प्रोजेक्टसाठी उपयोग करता येईल. प्रत्येक विषयावर तुम्हाला इकडे अफाट माहिती मिळेल. तेव्हा मग काय ते लक्षात आहे ना? हे पुस्तक वाचून झालं, खेळून झालं की ह्या साईटला भेट द्यायची आणि खूप काही नवं शिकायचं. तो फिर हो जाये.... नेट... सेट... गो....

- ज्योती कपिले
९३२४३०५४३३

## Counting Practice

Count and then draw line to the correct numbers.



4

6


3

8

5

9

# मूर्ति लहान पण कीर्ती महान



फार फार वर्षापूर्वी सरस्वती नदीच्या काठावर याजश्रवस् नावाचे ऋषि रहात होते. त्यांच्या आश्रमात अध्ययनासाठी येणाऱ्या शिष्यांची ते स्वतःच्या मुलांप्रमाणे काळजी घेत. दानाचे महात्म्य ते जाणत होते. आसक्ती सोडून दानधर्म केल्याने आपल्याला पुण्यसंचय करता येईल व परमेश्वराची कृपा होईल म्हणून त्यांनी दानधर्म करण्यास सुरुवात केली. अशाप्रकारे प्रभूची उपासना करून इहलोकीच्या हालअपेष्टा व संकटांपासून मुक्ती मिळून अखेर स्वर्गप्राप्ती होईल याची त्यांना खात्री होती.

ऋषिवर्यांना एक लहान मुलगा होता. त्याचे नांव त्यांनी 'नचिकेत' असे ठेवले होते. 'नचिकेत' म्हणजे तेज. ऋषि दानशूर होते. पण दानाचा खरा अर्थ त्यांना पूर्णपणे उमगला मव्हता. आसक्ती पूर्णपणे सुटली नव्हती. दानांत सर्वश्रेष्ठ दान म्हणजे गोदान. याजश्रवस् ऋषिंनी जास्तीत जास्त गायी दान करण्याचा संकल्प सोडला. पण आश्रमातल्या धष्टपुष्ट दुभत्या गायीइचे दान न देता ऋषि महाशय अशक्त, म्हाताऱ्या, भाकड गायी दान करू लागले. दुभत्या गायी दान केल्यास आश्रमातील मुलांचे पोषण कसे होणार, शिवाय शेतीसाठी धष्टपुष्ट सशक्त बैल कसे मिळणार असा त्यांचा विचार असावा.

नचिकेतने हे पाहिले. त्याला तर शिकवले होते की आपल्या जवळ जे उत्तम आहे, निर्दोष आहे त्याचेच दान करावयास हवे. तरच परमेश्वर प्रसन्न

होईल. शिवाय दान द्यायची वस्तु उत्तम असून आपल्याला सर्वात प्रिय असलेली हवी. अत्यंत आवडती वस्तु दुसऱ्याला दिल्यानेच आसक्ती दूर होईल. मगच परमेश्वर प्रसन्न होईल. साधा अतिथी जरी आपल्या घरी आला तरी उत्तम व ताजा स्वयंपाक करूनच आपण त्याला भोजन देतो. आपले बाबा आश्रमातील मुलांच्या जबाबदारीमुळेच उत्तम गायी दान करत नसावेत असे त्याला वाटले. त्याने वारंवार याबद्दल वडिलांना विचारले पण ऋषि त्याला उत्तर देण्यास टाळाटाळ करीत. एक दिवस लहानग्या नचिकेतने खूप विचार केला. 'आपण वडिलांना कशी मदत करू शकू? या गायी प्रमाणेच आपल्यावरही त्यांचा पूर्ण हक्क आहे. आपण अगदी धष्टपुष्ट असून शिवाय हुशारही आहोत व त्यांना सर्वात प्रिय सुद्धा आहोत. मग त्यांनी जर मलाच कुणाला दान दिले तर त्यायोगे वडिलांना खचितच अधिक पुण्य लाभेल. आपल्यावरील प्रेमामुळे वडिल अशी कल्पना सुद्धा करणार नाहीत. आपणच का सुचवू नये त्यांना हे.' हा विचार त्याला स्वस्थ बसू देईना. एके दिवशी त्याने आपली इच्छा ऋषिवर्यांना सांगितली. त्यावर त्यांनी नचिकेतच्या डोक्यात हसून टपली मारली व त्याला खेळायला जायला सांगितले.

आपल्याला बाबा अजून लहान समजतात. आपण किती गंभीरपणे विचार करून हा उपाय शोधलाय. ते काही नाही, आपले म्हणणे वडिलांना पटवून द्यायचा त्याने अगदी निर्धारच केला पण वडिलांना त्याचे म्हणणे काही पटले नाही. २/३ वेळा नचिकेतने सांगितल्यावर ते एकदम चिडून म्हणाले, "हो का! तुला दानात देऊन टाकू का? ठिक आहे मी तुला यमालाच दान देऊन टाकतो."

इकडे मुलाच्या मनात काय चालले आहे हे वडिलांना कळले नाही व वडिलांच्या मनात काय आहे हे मुलाला समजले नाही. त्याला वाटले, चला शेवटी वडिलांनी आपले ऐकले. नचिकेत निघाला यमाच्या घरी. आता यजश्रवस् ऋषिंच्या लक्षात आले की रागाच्या भरात काय बोललो आपण. त्यांनी नचिकेतची खूप आर्जवे केली.

पण बाबा तुमचा शब्द खोटा कसा करणार म्हणून नचिकेत निघालाच. पण यमराज घरी कुठले सापडायला? ते तर कामात अत्यंत व्यग्र. त्यांना थोडी सुद्धा उसंत नव्हती घरी थांबायला. त्यांचे काम तरी किती जोखमीचे. थोडी सुद्धा चूक नाहि कपायची कारण अगदी प्राणांशीच गाठ. तीन दिवस झाले, कामात गुंतल्याने यमराज काही घरी परतले नाहीत. त्यांच्या पत्नीने पाहिले १२ वर्षाचा एक तेजस्वी बटु दरवाज्यात त्यांची वाट पहात तिष्ठत उभा आहे. तिने जाऊन नचिकेतला आत येण्यास विनवले. ती म्हणाली, “अहो बालपंडित, आत या. आसन ग्रहण करा, भोजन करा. मला आपल्या सेवेची संधी द्या.” पण छे! यजमान घरी नसताना त्यांच्या घरात जाणे हे योग्य नव्हे असे सांगून नचिकेतने दारातच थांबणे पसंत केले. तीन दिवसांनी यमराज घरी परतले. दरवाजात त्यांची वाट पहात ताटकळलेल्या त्या तेजस्वी ब्राह्मण पुत्राला त्यांनी पाहिले. पत्नीवर नाराज झाले. पण सर्व हकिकत कळल्यावर म्लान चेहरा झालेल्या नचिकेतला त्यांनी येण्याचे आयोजन विचारले. नचिकेतने ते सांगताच त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. ज्या यमराजाच्या सावलीच्या स्मरणाने सुद्धा भल्या भल्यांना भीतीने कंप सुटतो त्यांची वाट पहात हा मुलगा तिष्ठत उभा होता. या लहानग्या ब्राह्मणावर तर त्यांची मर्जीच बसली. ते म्हणाले, “बाबारे, तुला जरी तुझ्या वडिलांनी मला देऊन टाकले आहे तरी मी असे दान घेऊ शकत नाही. तुझी अजून वेळ आली नाही व वेळे आधी यमाच्या दरबारात कुणीही हजेरी लावू शकत नाही. जा बाबा तू परत.” पण नचिकेत काही हलेना. तो त्याला ठेऊन घेण्याचा यमाला आग्रह करु लागला. शेवटी यम म्हणाला, “हे बघ पाहिजे तर मी तुला तीन वर देतो. तुला पाहिजे ते माग पण येथून परत जा.” नचिकेतची यमाने खूप समजून काढल्यावर कुठे नचिकेता तयार झाला. पहिल्या वराला त्याने मागितले, “मी घरी गेल्यावर माझ्या वडिलांनी मोठ्या प्रेमाने माझे स्वागत करावे.” म्हणजे या वराने त्याच्या



वडिलांचा रागच नाहीसा व्हावा हा वर मागितला. त्यांच्या कोपिष्ट स्वभावानेच त्याच्यावर ही पाळी आली होती.

दुसऱ्या वराने त्याने यमाकडून ब्रह्मज्ञान प्राप्त केले. आत्मा म्हणजे काय? मृत्यू म्हणजे काय? अमरत्व कसे प्राप्त होते? वगैरे.

तिसऱ्या वराने त्याने स्वत:साठी स्वर्ग प्राप्ती व्हावी असा वर मागितला.

आपल्या वडिलांवर अतोनात प्रेम असल्याने नचिकेताने फक्त मृत्यूचाच सामना केला नाही तर आपल्या वडिलांना सुख व संपत्तिची प्राप्ती करून देऊन पुत्रधर्म निभावला व निर्धार व बुद्धिमत्तेच्या जोरावर उच्चज्ञान प्राप्त करून स्वत:चाही उद्धार केला. पुढे फार मोठी ग्रंथ संपदा तयार करून भारत वर्षांत आपले नांव अजरामर करून ठेवले.

धन्य ती बालके व धन्य तो भारतदेश. उगीच नाही विवेकानंदांनी म्हटले, "मला एक नचिकेत द्या मी देशाचे भवितव्य बदलीन."

*– सरस्वती दातार*

९८२१९२८६७२

# My Story Book

I have a story book that contains hundred stories,
of fairies and demons, flowers and butterflies.
Each story has a picture and a great moral,
bring on my face a smile-millon-dollar.
When granny isn't there for bed-time-story,
my book assure me saying, "Child, don't worry"
When I am not well and can't go out,
my book stands by me, hard and stout.
My book, my best friend, is full of laughs-cries,
I've read every story, a hundred-hundred times.

*- Dr. Suman Navalkar*
*9969028967*



बँक ऑफ इंडिया

नातं बँकिंग पलिकडचं




SEASONS
enterprises pvt. ltd.
Plaza Asiad, Station Road, Santacruz (W), Mumbai - 400 054
Tel.: +91 22 26042798


PARLE
Happy Happy™
Choco-Chip Cookies
everest/PB/89-13